# ARTS AND COMMERCE COLLEGE VADUJ

NAME - KHADE KOMAL ANANDA

ROLL NO - 409

SUBJECT - Co-Opeeation

TEACHER - Prof. KHOT C.M.

CLASS - B.Com III

YEAR - 2018-19

Scanned with CamScanner

प्रश्न - ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका स्पष्ट करा?

→ प्रस्तावणा :→

'सामाजिक बांधिलकी आणि सहकार क्षेत्र यातील परस्परसंबंधाविषयी नेहमीच चर्चा होत असते. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला एक नवी दिशा दिली आहे. साखर कारखाने विकासाची केंद्रे बनली आहेत. ग्रामीण विकासातील सहकारी साखर कारखान्यांची भूमिका पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांवरुन लक्षात येईल.'

- भूमिका :→

i) व्यवस्थापनातील कौशल्य.
ii) अभूतपूर्व शैक्षणिक प्रगती.
iii) लहान शेतकऱ्यांची पत वाढली.
iv) पिकाखालील जमीन वाढली.
v) शेतीला पाणी पुरवठा वाढला.
vi) खेड्यात सुबत्ता निर्माण झाली.
vii) उसाखालील क्षेत्र वाढले.
viii) रोजगार वाढला.
ix) वाहतूक मार्ग व साधनांत वाढ
x) इतर उद्योगांचा विकास
xi) बँकिंग सवयीचा प्रसार
xii) इतर महत्त्वाच्या भूमिका

'वरिल सर्व भूमिकांचे पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे.'

i) व्यवस्थापनातील कौशल्य :→

'सहकारी साखर कारखान्यांच्या क्षेत्रात अनेक सुधारणा जनतेच्या प्रगतीसाठी झालेल्या आहेत. ग्रामीण भागातील माणसे मोठमोठ्या कारखान्यांचे व्यवस्थापन कौशल्याने करु कऱु शकतात. हे सिद्ध झाले आहे. के. विखे पाटील, वसंतदादा पाटील अशा व्यक्तिंचे लौकिक शिक्षण फारसे झालेले नसतात तरिदेखील त्यांनी साखर कारखाने कार्यक्षमरित्या चालविले. अलीकडे सहकारी साखर कारखान्यांची व्यवस्थापनाची विविध विषयांतील पदवीधर आढळतात. जरी बहुसंख्य संचालक फारसे

शिक्षित नसले तरि कारखाना चालविण्यातील त्यांची कार्यक्षमता निश्चितच उच्च असते. ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या व्यवस्थापन कौशल्याने सहकारी साखर कारखानदारी वाढली. ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली.

ii) अभूतपूर्व शैक्षणिक प्रगती :→

महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक क्रांती घडवून आणली आहे. अनेक कारखान्यांनी विविध शैक्षणिक संस्था चालविल्याने गरिब शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेता आले. साखर कारखाने कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्थांना अनुदान देतात. शेतकरी सभासदांच्या आर्थिक, शैक्षणिक सामाजिक विकासाच्या दृष्टीने कारखाने अनेक योजना आखतात. आर्थिक सुबत्ता व गावाजवळ शैक्षणिक सोई यामुळे अशिक्षित आई- बापांची मुले पदवीधर होऊ लागली. यासाठी सहकारी साखर कारखाने कारणीभूत ठरले. अनेक कारखान्यांनी मेडिकल कॉलेजीस सुरु करुन प्रगत औषधोपचाराच्या सोई उपलब्ध करुन दिल्या.

iii) लहान शेतकऱ्यांची पत वाढली :→

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची खऱ्या अर्थाने लहान व सीमांत शेतकऱ्यांची उन्नती घडवून आणली. 90% पेक्षा अधिक सभासद लहान शेतकरी आहेत. त्यांच्याकडे साखरकारखान्यांचे 70 ते 80% पेक्षा भागरोखे आहेत. त्यांच्याकडे लहान शेतकऱ्यांना फारशी पत नव्हती. बँका, पतसंस्था त्यांना फारशी कर्जे देत नसत. पण त्यांचा ऊस साखर कारखान्यांना जाऊ लागल्याने त्यांची पत आपोआप वाढू लागल्याने त्यांना कर्जे मिळू लागली. कारखान्यांकडून उचल मिळू लागली. याचा अर्थ सहकारी साखर कारखान्यांमुळे ग्रामीण क्षेत्रातील लहान व आदीवासी शेतकऱ्यांना समाजात प्रतिष्ठा लाभली.

iv) पिकाखालील जमिन वाढली :→

सहकारी साखर कारखान्यांमुळे प्रत्यक्षात पिकाखालील जमिन वाढल्याने दिसुन येते. हेक्टरी ऊस उत्पादन वाढ ओसाड व माळरान जमिनीवर शेतकऱ्यांनी स्वखर्चाने अगर कारखान्यांच्या मदतीने सहकारी पाणीपुरवठा संस्थांमार्फत

Scanned with CamScanner

पाणी नेऊन ती पिकाऊ बनली. माळरानावरील जमिनी तयार करण्यासाठी कारखान्याकडून सवलतीच्या दरात सभासदांना बलुतेदार, कर्मचारी, यंत्रे दिले. अशा पडिक जमिनी लागवडीखाली आणल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. शासनाच्या योजनेने जी कामे झाली नसली ती साखर कारखान्यांनी करुन

V) शेतीला पाणीपुरवठा वाढला :→

'उसाला चांगला दर मिळून पैसे मिळतात याची खात्री पटल्याने गावांगावांतील शेतकऱ्यांनी मतभेद विसरुन एकत्र येऊन सहकारी पाणीपुरवठा योजना आखल्या. नदीपासून 10 km पेक्षा अधिक अंतरावर पाणी नेऊन ऊसशेती फुलविली. सामान्य व गरीब शेतकऱ्यांत ही धडाडी सहकारी साखर कारखान्यांनी निर्माण केली या क्षेत्रातील शेतकरी पाण्याच्या वर्षभर व मुबलक सोईने उसासह इतर पिके घेऊ लागला. वर्षातून 2-3 पिके घेता येऊ लागली. शेतीचे नवे तंत्र, नवे बियाणे, रासायनिक खते वापरुन शेतीचे उत्पादन वाढले. वर्षभर तो कामात गुंतून राहीला.'

vi) खेड्यात सुबत्ता निर्माण झाली :→

'पूर्वी निव्वळ शेती उत्पन्नावर कुटुंबाच्या उदरनिर्वाह शक्य नसे. पण सहकारी साखर कारखान्यांमुळे अनेक लोकांच्या नोकऱ्या उपलब्ध झाल्या. शेतीसाठी अधिक लोकांची गरज भासली. शेतकरी ट्रॅक्टर घेऊन तो भाड्याने नांगणीसाठी व हंगामात ऊस वाहतुकीसाठी देऊन चांगले उत्पन्न मिळवू लागला. नोकरवर्ग सामान्यत: कारखाना परिसरातील असल्याने शेतकरी नोकरी व उसाच्या पैशाने कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारुन खेड्यात सुबत्ता निर्माण झाली. शेतकऱ्यांना खात्रीची बाजारपेठ मिळाल्याने शेतकरी कुटुंब कसे सुधारते हे साखर कारखान्यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे.'

vii) उसाखालील क्षेत्र वाढले :→

• सहकारी साखर कारखान्यांमुळे ऊसाला योग्य व निश्चित दर मिळतो याचा अनुभव आल्याने शेतकरी उसाकडे वळू लागले उसाखालील क्षेत्र वाढले. साहजिकच कारखान्यांमुळे ऊस क्षेत्राखालील जमीन वाढली. लहान शेतकऱ्यांना चांगला पैसा मिळाल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारली. साखर कारखाने देत असलेले प्रोत्साहन आणि उत्पन्नात होणारी वाढ यामुळे

उसाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे.

viii) रोजगार वाढला :→

• सहकारी साखर कारखानदारीने महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात रोजगार वाढला. गळीत हंगामाच्या काळात ऊस तोडणी व वाहतुकीसाठी अधिक कामगार लागतात. वाहतुकीसाठी बैलगाड्या व अन्य साधने लागतात.

• हे सर्व कामगार मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात येतात. 5-6 महिन्यांच्या काळात काम करुन हे कामगार वर्षभराच्या उदरनिर्वाहाची सोय करतात. त्यामुळे सहकारी साखर कारखाने त्याच भागातील लोकांना रोजगार देत नाहीत तर महाराष्ट्राच्या इतर भागातील लोकांनाही रोजगार देतात.

ix) वाहतुक मार्ग व साधनांत वाढ :→

• सहकारी साखर कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ऊस वाहतुक करता यावी यासाठी गावातील रस्ते दुरुस्त केले. प्रत्येक गाव मुख्य रस्त्यांशी जोडण्यात आले. त्यामुळे हंगामाच्या व त्यामुळे बारमाही वाहतुक सुरु ठेवणे शक्य झाले. अनेक शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, ट्रॉली घेतल्या. त्यामुळे हंगामाच्या काळात त्यांचा वाहतुकीसाठी उपयोग करता येऊन उत्पन्न मिळविता येऊ लागले. अनेक खेड्यांमध्ये मोटार-सायकली, जीप, कार, ट्रक्स इ. वाहने दिसुन येऊ लागली. खेड्यात सिमेंट काँक्रिटच्या इमारती उभ्या राहिल्या. या सर्वांचे मुख्य कारण म्हणजे त्या भागातील सहकारी साखर कारखाने आहेत.

x) इतर उद्योगांचा विकास :→

• सहकारी साखर कारखान्यांनी उत्पादनाचे व कामाचे विविधीकरण केले. साखर उत्पादनाबरोबर कृषि-औद्योगिक, प्रकल्प, मद्य व मद्यार्क, रसायने व अम्ले, असेटिक, अनहायड्राईड, पोटॅश, असेटोन, आक्सालिक, ॲसिड, कागदनिर्मिती, घरबांधणी इ. अनेक उद्योगांचा विकास झाला. ट्रॅक्टर, बुलडोझरची दुरुस्ती, वीज मोटारदुरुस्ती व रिवायंडिंग आदी गोष्टी कारखाना क्षेत्रात होऊ लागल्या. अनेकांना रोजगार मिळाला. गोबरगॅस संयंत्र

Scanned with CamScanner

उभारणे, दुग्धव्यवसाय, कुक्कुट व वराहपालन, पशुपैदास, कोंबडीचे खाद्य तयार करणे, वस्तुभांडार चालविणे इ. अनेक व्यवसाय प्रगत झाले. यामुळे लोकांना विविध वस्तु योग्य किमतीत मिळून त्यांच्या राहणीमानाचा स्तर उंचावला.

xii) बँकिंग सवयीचा प्रसार :→

• सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना ऊसाची किंमत रोख पैशात न देता बँकेच्या माध्यमातून देण्यास सुरुवात केली. त्यामुळे सहकारी बँकांचा विकास झाला.

• अनेक शेतकरी बँकेत येऊन पैशाची देवघेव करु लागली. त्यांना बँकेचे महत्त्व कळून व पटवून त्यांच्यामध्ये बँकिंग व्यवहाराची सवय वाढली. ग्रामीण क्षेत्रातील पैसा बँकेत राहिल्याने त्याचा भांडवल म्हणुन आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेता आला. सहकारी साखर कारखान्यांनी नागरी बँका उभारल्या. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात बँकिंग सवयींचा वेगाने प्रसार झाला.

xiii) इतर महत्त्वाच्या भूमिका :→

• सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांना ऊसाची किंमत रोख पैशात न देता बँकेच्या माध्यमातून देण्यात सुरुवात केली. त्यामुळे सहकारी बँकांचा विकास झाला. अनेक शेतकरी बँकेत येऊन पैशाची देवघेव करु लागले. त्यांना बँकेचे महत्त्व पटवून त्यांच्यामध्ये बँकिंग व्यवहाराची सवय वाढली.

• ग्रामीण क्षेत्रातील पैसा बँकेत राहिल्याने त्याचा भांडवल म्हणुन आर्थिक विकासासाठी उपयोग करुन घेता आला. सहकारी साखर कारखान्यांनी नागरी बँका काढल्या.

• जळगाव व नाशिक जिल्ह्यातील 4 सहकारी साखर कारखान्यांनी प्रत्येकी 12 कोटी रु. खर्चुन ऊस शेतीला नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी पाटबंधाने योजना सुरु केल्या.

• मराठवाड्यातील नांदेडजवळील 8 ते 10 कारखान्यांनी एकत्रित येऊन सिकामच्या मदतीने कागद कारखाना उभारला आहे. अनिष्ठ प्रथा टाळून, सामुहिक विवाह, उपयुक्त घालुन आहेर देऊन गरीबांचे कल्याण साधले जाते.

Scanned with CamScanner

" स्त्रियांच्या कल्याणासाठी पापड, लोणचे असे व्यवसाय चालवून त्यांचा रोजगार यास प्राप्त करुन दिला जातो. कर्मचाऱ्यांसाठी गृहबांधणी व क्रिडा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. वीजनिर्मिती केली जाते. ऊस संशोधनावर भर दिला जातो."

" सांस्कृतिक व्यवसायात मदत केली जाते. कारखान्यांनी विकासाची गंगा खेड्यात नेल्याने माणसांमध्ये बदल होत आहे. माणुस बदलण्याचे मोठे कार्य कारखान्यांनी केलेले आहे."

Scanned with CamScanner